खसरा क्रमांक,११० व ११२ मौजा इंदोरा, सिध्दार्थनगर, टेका, नागपूर येथे उर्दू घर बांधण्यासाठी वर्ष २०१९-२० मध्ये अनुदान वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः वक्फ २०१७/प्र.क्र.१७३/का.४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ३१.०७.२०१९

वाचा -

१) कार्यकारी अभियंता (उत्तर), सार्वजनिक बांधकाम विभाग यांच पत्र क्रमांक कार्य.अभि. (उत्तर)/ २१२६, दि.०३.१०.२०१८.
२) अल्पसंख्याक विकास विभाग पत्र क्रमांक , वक्फ २०१७/प्र.क्र.१७३/का.४, दि.२१.०८.२०१७
३) जिल्हाधिकारी,नागपूर यांचे आदेश क्रमांकः कक्ष १२/एमयुएन ५/कावि/३३२/प्रमा ७४/ २०१९, दि.१२.०६.२०१९
४) जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्रमांकः कक्ष १२/एमयुएन ५/कावि ३८५/२०१९, दि.११.०७.२०१९
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९

प्रस्तावना -

खसरा क्रमांक,११० व ११२ मौजा इंदोरा, सिध्दार्थनगर, टेका, नागपूर येथे उर्दू घर बांधकामासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय -

अधिक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी दि.१७.०७.२०१७ येथील पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरुन खसरा, क्रमांक ११० व ११२, मौजा-इंदोरा, सिध्दार्थनगर, टेका, नागपूर येथील इस्लामिक कल्चरल सेंटरची इमारत "नागपूर उर्दू घर" म्हणून संचालन, व्यवस्थापन व देखभाल-दुरुस्तीसाठी, अल्पसंख्याक विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास विभागाने दि.२१.०८.२०१७ च्या शासन पत्रान्वये सहमती प्रदान केलेली आहे. उर्दू घर या प्रयोजनासाठी वर्ष २०१९-२० मध्ये रु.८.५० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.५.१० कोटी एवढा निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरणासाठी उपलब्ध आहे. संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, नागपूर यांनी रु.५०,९३,३००/- इतक्या किंमतीच्या अतिरिक्त कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, नागपूर यांनी संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये नागपूर उर्दू घरासाठी अग्नीशमन काम, सिव्हील वर्क, विद्युत काम तसेच प्लंबिगचे कामासाठी रु.५०,९३,३००/- इतके अनुदान वितरित करण्याची मागणी सादर केली आहे. त्यास अनुसरुन नागपूर उर्दू घरासाठी अर्थसंकल्पीय अनुदानातून वरील संदर्भ

क्र.५ व ६ येथील शासन परिपत्रकातील मान्यतेस अनसरुन, जिल्हाधिकारी, नागपूर यांना रु.५०,९३,३००/- (रुपये पन्नास लाख त्र्याणव हजार तीनशे मात्र) इतके अनुदान वितरित करण्यास याद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी, नागपूर यांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षात वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रु.५०,९३,३००/- (रुपये पन्नास लाख त्र्याणव हजार तीनशे मात्र) इतकी रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून आहरण करुन कार्यकारी अभियंता (उत्तर), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना संवितरण करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. सदर निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, नागपूर यांनी शासनास सादर करावे. कार्यकारी अभियंता (उत्तर),नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी सदरच्या बांधकामाचे वेळापत्रक व बांधकाम पूर्ण करण्याचा नियोजित दिनांक शासनास त्वरीत कळवावा.

यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडई-१ २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण - २००- इतर कार्यक्रम-राज्य योजनांतर्गत योजना- (००)-(००)(१८) - उर्दू घरासाठी सहाय्यक अनुदाने (२२३५ ए ५५२) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९ आणि वित्त विभाग क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३११५४३२६७७१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fde30534317da1ea9bdb3e7bec3c1084d5d608a86e993f8ac0fa02331b77751, serialNumber=b469b3fd61b5201f03b702c0f7fd0ec5cf18beb12425455f4856f44e3d4da763, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2019.08.02 10:56:03 +05'30'

(सं. छ. तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, नागपूर,
३. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर,
४. कार्यकारी अभियंता (उत्तर),नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, जि.नागपूर,
५. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,

६. अधीक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, मुंबई,
७. स्वीय सहायक, प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. स्वीय सहायक, सह सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. स्वीय सहायक, उप सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. कक्ष अधिकारी (का-७). अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. वित्त विभाग / नियोजन विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती (का-४)/कार्यासन-४, संग्रहार्थ.